**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**नो टी स**

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची प्रकरण 8 नियम नंबर 13 (1) व 15 (1) अन्वये )

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची प्रकरण 8 नियम नंबर 13 (1) व 15 (1) अन्वये जाहिर नोटीस देण्यांत येत आहे की, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतीचे करयोग्य मूल्य दर्शविणारी सन 2009-2010 या मुदतीची कर आकारणी पुस्तके (असेसमेंट रजिस्टर) पूर्ण करण्यात आली असून, ती खाली नमूद केलेल्या महापालिकेच्या प्रभाग कार्यालयात ठेवली आहेत ती कार्यालयाचे कामाचे दिवशी व वेळेत त्या-त्या प्रभाग कार्याायात पहावयास मिळतील.

| अ. क्र | विभागाचे नांव | कर आकारणी पुस्तके ज्या कार्यालयात ठेवली आहेत, त्या कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|
| 1 | उथळसर प्रभाग समिती कार्यालय | दुसरा मजला, उथळसर प्रभाग समिती कार्यालय,उथळसर, ठाणे (प) |
| 2 | नौपाडा प्रभाग समिती कार्यालय | तळमजला, नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, नौपाडा, ठाणे (प) |
| 3 | कोपरी प्रभाग समिती कार्यालय | दुसरा मजला, कोपरी प्रभाग कार्यालय, दौलत नगर, कोपरी, ठाणे (प) |
| 4 | वर्तकनगर प्रभाग कार्यालय | करवसुली विभाग, 1 ला मजला, वेदान्त कॉम्प्लेक्सजवळ,कोरस कंपनीच्या समोर,ठाणे(प) |
| 5 | वागळे इस्टेट प्रभाग समिती कार्यालय | करवसुली कार्यालय, पहिला मजला,वागळे इस्टेट विभाग, रायलादेवी तलावाशेजारी,ॲटोमॅटीक इलेक्ट्रीक लि. समोर,वागळे इस्टेट, ठाणे (प) |
| 6 | रायलादेवी प्रभाग समिती कार्यालय | करवसुली विभाग,दुसरा मजला,रायलादेवी प्रभाग कार्यालय, रायलादेवी तलावाशेजारी,ॲटोमॅटीक इलेक्ट्रीक लि. समोर,वागळे इस्टेट, ठाणे (प) |
| 7 | कळवा प्रभाग समिती कार्यालय | दुसरा मजला, यशवंत सायबा तरण तलाव, मनिषा नगर, कळवा (प) |
| 8 | खारीगांव उप प्रभाग कार्यालय | पहिला मजला, खारीगांव उपप्रभाग कार्यालय, मराठी शाळेच्या समोर, खारीगांव |
| 9 | विटावा उप प्रभाग कार्यालय | उप प्रभाग कार्यालय, पाण्याच्या टाकी शेजारी, विटावा,ठाणे |
| 10 | मुंब्रा प्रभाग समिती कार्यालय | पहिला मजला, सहयोग सेंटर, आनंद कोळीवाडा समोर, मुंब्रा |
| 11 | कौसा-डावले उप प्रभाग कार्यालय | आलमास कॉलनी, बसस्टॉपच्या मागे, मुंबई-पुणे रोड, कौसा |
| 12 | दिवा उप प्रभाग कार्यालय साबे,आगासन,दातिवली, म्हातार्डी,बेतावडे) | दिवा मराठी शाळेच्या बाजूला, रेल्वे स्टेशन समोर, दिवा |
| 13 | शिळ उप प्रभाग कार्यालय (डायघर, खिडकाळी , पडले, देसाई) | मुंबई-पुणे रोड, कल्याण फाटा, दत्त मंदिर समोर, शिळ |

| | | |
|---|---|---|
| 14 | माजिवडा प्रभाग कार्यालय | करवसुली विभाग, तळमजला, माजिवडा प्रभाग कार्यालय, माजिवडा गांव, माजिवडा, ठाणे (प) |
| 15 | बाळकूम उप प्रभाग कार्यालय | पहिला मजला, अग्निशमन दल कार्यालय, बाळकूम,ठाणे |
| 16 | कोलशेत उप प्रभाग कार्यालय | उप प्रभाग कार्यालय, तरीचा पाडा, महापालिका शाळा, कोलशेत,ठाणे |
| 17 | चि.मानपाडा उप प्रभाग कार्यालय | मानपाडा उपप्रभाग कार्यालय ,चि.मानपाडा, ठाणे |
| 18 | ओवळा उप प्रभाग कार्यालय (कावेसर, कासारवडवली ) | ओवळा उप प्रभाग कार्यालय, घोडबंदर रोड, ओवळा बस स्टॉप जवळ,ओवळा, ठाणे |

सदर पुस्तकात समाविष्ट करण्यांत आलेल्या मिळकतीचे आपण मालक किंवा ताबेदार आहोत असा हक्क सांगणा-या प्रत्येक व्यक्तिस आणि अशा व्यक्तिंच्या कोणत्याही प्रतिनिधीस सदर पुस्तकाची तपासणी करण्याची आणि कोणत्याही प्रकारचा आकार (फी) न देता पुस्तकामधून उतारे करुन घेण्याची मुभा आहे.

या कर आकारणी पुस्तकात नमूद केलेले करयोग्य मूल्य, आकारणी किंवा इतर नोंदी यासंबंधी मिळकतीचे मालक किंवा ताबेदार यांच्या हरकती किंवा तक्रारी असतील तर अशा मालक किंवा ताबेदार किंवा अशा मालकांच्या किंवा ताबेदारांच्या प्रतिनिधीने अशा हरकती किंवा तक्रारी सूचना **सोमवार दिनांक 6 एप्रिल, 2009 ते मंगळवार दिनांक 28 एप्रिल,2009 या कालावधीत** (सार्वजनिक सुट्ट्या वगळून) कार्यालयीन वेळेत तक्रारींच्या कारणासह, "उपआयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे" यांचे नांवे लेखी पाठवाव्यात.

**दिनांक 6 एप्रिल, 2009** पूर्वी आणि **दिनांक 28 एप्रिल, 2009** नंतर आलेल्या तक्रार अर्जांचा विचार केला जाणार नाही.

कळावे.

मा.आयुक्त सो.यांच्या मान्यतेने

कर निर्धारक व संकलक,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक :-

**विशेष सूचना**

1) मिळकतीचे कर आकारणी विरुध्द केलेला तक्रार अर्ज महानगरपालिका कार्यालयात पोहोचल्याबद्दल लेखी पावती घेणे जरुर आहे. पाठविलेला अर्ज महानगरपालिकेकडे न पाहोचल्यास त्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

2) प्रत्येक मिळकतीबद्दल स्वतंत्र अर्ज करावयास पाहिजे

ज्या मिळकतीच्या आकारणीबाबत तक्रारी अर्ज करावयास असेल त्या जागेचे वर्णन विशेषतः मालमत्ता क्रमांक टिका नंबर, सिटी सर्व्हे नंबर, घर नंबर, ठिकाण वगैरे व महानगरपालिकेने ठरविलेले करयोग्य मूल्य ही माहिती अर्जात जरुर असावयास पाहिजे.

टि प :- अर्ज संबंधित प्रभाग कार्यालयाकडे करण्यांत यावेत.